# रोप अमृताचे

**प्रवीण दवणे**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**रोप अमृताचे**
प्रवीण दवणे

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखक**
प्रवीण दवणे
ब-३०३, 'राजहंस' लुईसवाडी
पारसिक बँकेसमोर, ठाणे (प.), ४००६०४
फोन नं. ०२२-२५८२३३३१ मो. नं. : ९८२०३८९४१४

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ १७०/-

# अर्पणपत्रिका

विष्णू रत्नपारखी
सदतरीष भोईर
शाहीर दामोदर विटावकर
जयवंत पाटील
किशोर पाडळकर
माझ्या लेखन वाटचालीतील तुम्ही पंचप्राण!
आपल्या नावामागे 'कैलासवासी' लिहिण्याचे बळ नाही
आपल्या स्मृतींना समर्पित

# *रोप रुजविण्यापूर्वी...*

स्वातंत्र्यपूर्व काळातील समाजस्थिती दुर्दैवाने आज स्वातंत्र्योत्तर काळातही निर्माण झाली आहे, असे दिसते. तेव्हा लढावयाला ब्रिटिश नामक एक शत्रू तरी होता. आता आरशात पाहून आपणच आपल्याशी लढण्यासारखी विचित्र स्थिती झाली आहे. शिवराम महादेव परांजप्यांनी शतकापूर्वी लिहिले होते–'जेथे पाषाणच फितूर होतात तेथे माणसांचे काय?' आजही हा सवाल जुना होत नाही, हेच आपले दुर्दैव! सर्व बाजूंनी कुरतडणारी भ्रष्टाचाराची वाळवी, व्यभिचाराला मिळणारी प्रतिष्ठा, व्यसनांची लाजिरवाणी समर्थने, विकत जाणारे भाडोत्री विचारवंत, भाड्याने मिळणारी संमेलनांची अध्यक्षपदे, शिक्षण क्षेत्रात घुसलेल्या बधीर धनदांडग्या गेंड्यांचा हैदोस, जबाबदारीची यत्किंचित जाण आणि भान नसलेली प्रसारमाध्यमे, विद्यार्थ्यांना करावी लागणारी आत्मदहने, विधानसभेतील–लोकसभेतील प्रत्यक्ष हाणामारीच्या घटना इ. वातावरणात, केवळ थुलथुलीत मनोरंजन साहित्यिकाने वीत राहावे, हे मनाला पटत नाही. साने गुरुजींनी म्हटलं होतं, 'मला लेखणीच्या लालित्यापेक्षा झाडूचे लालित्य श्रेष्ठ वाटते.' या वाक्याला अनेक परीने अर्थ आहे. मने स्वच्छ करण्याचं काम लेखणीने करायला हवे आहे. कलात्मक की जीवनाभिमुख असे शब्दखोर वाद खेळत आपले जीवन नासण्याइतके ते अनंत नाही, हे विचारवंतांनाही कळू नये याची खंत वाटते. ज्या समाजामुळे, देशामुळे आपले उत्सव, मानसन्मान, यश–अपयश यांना अर्थ उरणार आहे, तो समाजच ग्लानीने मरणोन्मुख झाला, तर मिळालेल्या पुष्पगुच्छांचा सुगंध तरी कोण घेणार?

'रोप अमृताचे' हे केवळ अनेक पुस्तके प्रकाशित होतात, त्यांपैकी एक असू नये, असे मला वाटते. लेख लिहिताना अनेकदा लेखणीने हुंदके दिले आहेत. समाजाची घायाळ स्थिती पाहून अश्रू पाझरले आहेत. हे लेख वाचताना वाचकांना भोवतीच्या काळोखातून एखादा जरी किरण–झरोका उघडल्याचा प्रत्यय आला, तरी परिश्रमाचे सार्थक होईल.

केवळ ललित लेखन केलं जातं किंवा केवळ वैचारिक लेखन केलं जातं. प्रस्तुत लेखन हा ललित-वैचारिक लेखांचा नमुना ठरावा. बालपणी आणि तारुण्यात स्वातंत्र्यपूर्व काळातील निबंधकारांनी, विचारवंतांनी जसे मला झपाटून टाकले, तसे अलीकडच्या काळात दादा धर्माधिकारी, दुर्गा भागवत, ना. ग. गोरे, नरहर कुरुंदकर, रा. चिं. ढेरे, माधव आचवल इ. ललित विचारवंतांच्या लेखणीने मला मोहित केले. केवळ शैलीची भुलावण मला का कोण जाणे पडत नाही.

अभिव्यक्तीमागचा आतला आवाज म्हणजे त्या कलावंतांनी निवडलेल्या विषयाचे चिंतन. जगणं आशयघन असेल, तरच चिंतनाला एक आरसपानी डूब येते. शब्द हे शब्दच असतात; पण शब्दांत प्राण उजळले जातात ते लिहिण्याच्या तळमळीतून! लेखक हाही एरव्ही समाजातलाच एक घटक असलेल्या एरव्हीच्या घटकांप्रमाणेच तोही प्रसिध्दी-पैसा-भपकेबाज सन्मान यांना शरण गेलेला दिसतो. त्याचे हे शरण शब्दांना जाणेच कणाशून्य करते. मग शब्दांच्या पताका होतात. उत्सवापुरत्या फडफडतात, दुसऱ्या दिवशी त्यांचा कचरा होतो.

'रोप अमृताचे' लेखांचं पुढे काय होईल ते काळ ठरवील; परंतु या लेखांमागची भावना प्रत्यक्ष वाचण्यापूर्वी व्यक्त करावी म्हणून हा संवाद! 'नवशक्ती' दैनिकाच्या संपादिका सौ. वसुंधरा पेंडसे-नाईक असताना त्यांच्या प्रोत्साहनाने हे रोप उमलत राहिले. अन्यही काही लेख यात समाविष्ट केले आहेत.

आता हे रोप नव्या व अधिक व्यापक व सुबक स्वरूपात सादर करणाऱ्या रिया पब्लिकेशन्च्या शितल मेहता यांचे हार्दिक आभार!

माझ्या हृदयात रुजलेले हे 'अमृताचे रोप' आपणा सर्वांच्या हृदयात रुजविताना ते अधिकाधिक बहरून येवो, हीच प्रार्थना त्या विधात्या परमेश्वराजवळ करतो.

नमस्कार!

**- प्रवीण दवणे**

चैत्र पौर्णिमा, ६ एप्रिल, ९३

✦✦✦

# अंतरंग


| | | |
|---|---|---|
| १) | अध्यात्माचा तास आवश्यक .............................. | ९ |
| २) | सध्याची चित्रपटगीतं 'अशीच' का? ..................... | १२ |
| ३) | जॉर्ज बर्नार्ड शॉ आणि लिंकन.............................. | १६ |
| ४) | रिमझिम वाचक-पत्रांची .................................. | १९ |
| ५) | मैफल : महाविद्यालयातील पहिल्या दिवसाची ........... | २२ |
| ६) | सुरवंट आणि फुलपाखरू .................................. | २५ |
| ७) | आसवांत झुलणारा आकाशकंदिल ........................ | ३० |
| ८) | आवडते कलावंत म्हणजे प्रेषित नव्हेत! .................. | ३४ |
| ९) | जग : उपयोगी माणसांच्या शोधात ....................... | ३६ |
| १०) | नवा चेहरा हवा आहे! ..................................... | ३९ |
| ११) | कित्ती वेळ फुकट जातो! .................................. | ४२ |
| १२) | सादरकर्ते आणि सत्कारमूर्ती ............................. | ४५ |
| १३) | अध्यापन आणि नवनिर्मिती ............................... | ४९ |
| १४) | अहंभावाचा धूप जाळू गणपतीपुढे ....................... | ५३ |
| १५) | खोट्या प्रतिष्ठेपायी ....................................... | ५६ |
| १६) | जमाखर्च स्वातंत्र्याचा मांडणार केव्हा? .................. | ५९ |
| १७) | नोकरी करणारी आई ...................................... | ६२ |
| १८) | या तरुणांना कोणी तरी समजवा! ....................... | ६६ |
| १९) | मेंदू आणि हृदय यात संवाद हवा! ....................... | ६९ |
| २०) | नोकरी एके नोकरी ....................................... | ७२ |
| २१) | ...या भिंती कोण पुसणार? ............................... | ७६ |
| २२) | ...क्षण अमृताचा! ........................................ | ७९ |
| २३) | नादाचीही सोबत असते .................................. | ८२ |

२४)	अल्बम .................................................	८५
२५)	शोकांतिका : विज्ञानाची की मानवी बुध्दीची? ..........	८८
२६)	विद्यार्थ्यांना कधीच 'सुट्टी' नसते .........................	९१
२७)	सगेसोयरे .................................................	९४
२८)	कधी तरी मुक्काम येतोच ................................	९७
२९)	अजगराचा प्रचंड विळखा ................................	१००
३०)	गप्पातले यशवंतराव .......................................	१०४
३१)	दिव्याने तेवायचेच असते ................................	१०७
३२)	ठिणग्यांची उद्ध्वस्त झाडे! ..............................	१११
३३)	शाळा : गोठ्यात भरणाऱ्या ..............................	११५
३४)	खेळ 'जिवाशी' ...........................................	११८
३५)	एका भर दुपारी ..........................................	१२३
३६)	मुडद्यांची गल्ली ..........................................	१२७
३७)	गरज आहे थोड्याशा समजुतीची .......................	१३१
३८)	आजी-आजोबा ............................................	१३४
३९)	माणसाचे यंत्र आणि आनंदाचा मंत्र ....................	१३७
४०)	तुका म्हणे आम्हां नित्य दीपवाळी ......................	१४१

✦✦✦

## *अध्यात्माचा तास आवश्यक*

आजची शिक्षणव्यवस्था विलक्षण बहिर्मुखी आहे. केवळ 'माहिती'च्या ज्ञानाने मनं थकली आहेत नव्या पिढीची! त्यात विविध स्पर्धा परीक्षा, 'गुणां'ना महत्त्व आल्याने केवळ कोणत्याही प्रकारे 'गुणवान' होण्याची धडपड आणि त्यातूनच निर्माण होणारी पडझड, या गोष्टींनी एका दुष्टचक्राला सुरुवात होते. केवळ 'माहिती' वाहणारी गाढवं एवढंच ज्यांचं जीवन आहे आणि केवळ निर्जीव माहितीचं ओझं दुसऱ्यांच्या डोक्यात रिकामं करणं एवढंच शिक्षकाचं काम आहे, अशा समाजव्यवस्थेत नव्या मानसिक स्वास्थ्य असलेल्या समाजाची निर्मिती पूर्णतः अशक्य आहे.

पाठांतरामुळे मेंदूत कोंबली गेलेली स्थूल माहिती एखाद्या कॉम्प्युटरलासुध्दा असू शकते. कळ दाबली की, ती माहिती प्रगट होते. जिवंत माणूस त्याहून रसरसलेला असणं आवश्यक आहे. आज मोठ्या पदावर असलेल्या पदवीधर व्यक्तीकडूनही जो सरसकट भ्रष्टाचार होतो; चारित्र्याची, सुंदर जीवनाची ज्याला चाड वाटत नाही अशी केवळ 'माहितीवंत' माणसं देशाच्या विकासाचे, नव्या प्रकाशाचे झरोके होऊ शकत नाहीत.

माणसानं 'मेंदूला' जितके आज प्राधान्य दिले आहे, तेवढे 'हृदयाला' दिलेले नाही. बुध्दीला जेवढे महत्त्व दिले आहे, तेवढे भावनेला दिले नाही. बाह्य पध्दतीवर माणसाचे मूल्यमापन आज ठरले जाते.

व्यवहाराच्या सोईसाठी आई-वडील दोघांनाही 'वाढते' मूल घरात टाकून बाहेर पडावे लागते. महिन्याला येणाऱ्या आवकीच्या बळावर गुदमरले गेलेले वात्सल्य 'व्यवहारी' तडजोडीनेच विरेचित केले जाते. उदा. खाण्यापिण्याचे लाड, कपड्यालत्त्याची हौस-मौज, मनोरंजनासाठी 'पॉकेटमनी' दिला जातो. केवळ खात असलेले मन कुठल्या तरी युक्तीने शांत करावेच लागते. आई-वडील दोघांनाही वाढत्या महागाईत बाहेर पडणे आवश्यक आहे, हा मुद्दा मान्य केला तरी वात्सल्याअभावी केवळ बाह्य गोष्टींनी सुखावलेले हे मूल पुढे आंतरिकदृष्ट्या कोरडेच होते, हा परिणाम नाकारता येत नाही.

हा सगळा जगाचा 'बाजार' अभ्यासूनच शिक्षणतज्ज्ञांनी फार गंभीरपणे शिक्षणव्यवस्थेचे नवे स्वरूप ठरवायला हवे आहे. ज्याची उत्तरे 'मार्गदर्शक'मध्ये मिळतात, त्याहूनही वेगळे प्रश्न जीवनात पडत असतात. त्या प्रश्नांना सामोरे जाण्याचे मानसिक धैर्य आजच्या तरुणात उरलेले नाही. मग तो हे प्रश्न सहजपणे सोडविण्याच्या म्हणजे प्रश्नांपासून दूर पळण्याच्या मार्गावर जातो. याच मार्गात त्याची व्यसनांशी दोस्ती होते आणि हे नवे दोस्त त्याचा सर्वनाश करतात.

आत्यंतिक बुध्दीच्या आहारी गेल्यामुळे आलेले युक्तिवाद, चातुर्य, या बुध्दिग्रस्ततेमुळे निर्माण झालेली श्रध्दाशून्यता त्याला अरसिक करते. जीवनाचे सुंदर रंग झेलण्याचा ओलावा संपून जातो. एकमेकांच्या अनामिक नात्याचा सुगंध त्याला वेडं करीत नाही. तो प्रत्येक कृतीचा, प्रत्येक मानसिक उलाघालींचा तार्किक अन्वय शोधत राहतो. जगण्यात काही वेळा तर्कापलीकडचीही रहस्ये असतात, ज्याचा उलगडा होत नाही. तरीही ती असतात हे मात्र खरे आहे, हे त्याला कधीच कळत नाही. तो जे सिध्द होत नाही ते 'नाहीच' असे मानतो आणि चराचरात भरून उरलेल्या चैतन्याला पारखा होतो.

नव्या शिक्षणव्यवस्थेत जीवन रसिकतेने जगण्यासाठी दृष्टी देण्याचा प्रयत्न व्हायला हवा. अनेक तथाकथित शिक्षणशास्त्रज्ञांचे वैयक्तिक अहंकार आड येतात. तेही अनेकदा या बाह्य माहितीचेच शिकार असतात. त्यांच्याच हाती शिक्षणव्यवस्था जाते. त्यातून सर्व पिढीचा प्रवास चुकीच्या दिशेने सुरू होतो. अनेकदा ग्रामीण मुलांचे प्रश्न वेगळे असतात, शहरी मुलांचे प्रश्न वेगळे असतात. आपण 'सब घोडे बाराटक्के' अशी खोगीरभरती करून टाकतो. शिक्षणक्रम बनविणारे वेगळे असतात. त्या शिक्षणाचे बोट धरून जगणारे वेगळे असतात.

नव्या साहित्यसमीक्षेप्रमाणे बोधवादी किंवा आदर्शवादी लेखन तुलनेने कमी दर्जाचे मानले असले, तरी सध्या आदर्शवादी साहित्याची नव्या पिढीपुढे गरज आहे असे मला ठामपणे वाटते. स्वतःचा स्वतंत्र विचार करू लागला की, फार तर तो आदर्शवादाचे जू फेकून देऊन कलावादी लेखन अभ्यासेल; पण कुठे तरी खोलवर संस्कार करणारं तेजस्वी लेखन अभ्यासक्रमात येण्याची फार गरज आहे. आज विविध प्रसारमाध्यमांतून स्वैराचार, रंगेलपणा यांचे कुसंस्कार ज्या गतीने आणि ज्या आवेगाने आढळत आहेत, ते पाहिलं की, भीती वाटते, पशूंमध्ये